११/६/०६ पुढारी

# प्राचार्य महासंघ सरचिटणीसपदी क्रांतीकुमार पाटील यांची निवड



कोल्हापूर, दि. १० : महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघाची कार्यकारिणीची बैठक नुकतीच झाली. यावेळी प्राचार्य महासंघाच्या सरचिटणीसपदी प्रचार्य डॉ क्रांतीकुमार रंगराव पाटील यांची निवड करण्यात आली. महासंघाचे अध्यक्ष डॉ. ढेंगळे यांनी डॉ. क्रांतीकुमार पाटील यांचे अभिनंदन केले. महाराष्ट्रातील अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयाचे प्रश्न प्रामुख्याने सोडवावयाचा निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने संचालक, उच्च शिक्षण विभाग व उच्च शिक्षणमंत्री राणे यांच्याशी चर्चा घडवून आणावी असे निश्चित करण्यात आले. तसेच प्राचार्य महासंघाचे पुढील अधिवेशन सरस्वती भवन शिक्षण संस्था औरंगाबाद यांच्या विद्यमाने विज्ञान महाविद्यालयात घ्यावे अशी विनंती डॉ. बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठ प्राचार्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. अदवंत यांनी केली. त्याप्रमाणे पुढील कार्यकारिणीची बैठक सरस्वती भवन विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद येथे घेण्याचे निश्चित करण्यात आले.

सरचिटणीसपद १५ वर्षानंतर मुंबईबाहेरील व्यक्तीस मिळाले. निवडणुकीचे सर्व कामकाज शहाजी लॉ कॉलेजचे प्राचार्य डी. बी. कुरणे यांनी पार पाडले.